# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १८.०१.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक १८ जानेवारी २००८ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ४.४५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,नगरसचिव तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१४. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१५. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१७. स.स.श्रीमती मसरत बेगम शरफोद्दीन
१८. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
२०. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२१. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२२. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२३. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२४. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२५. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२६. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२७. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२८. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२९. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
३०. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
३१. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
३२. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद

३३. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३४. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३५. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
३६. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
३७. स.स.श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन
३८. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३९. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
४०. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
४१. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
४२. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
४३. स.स.श्री.खान मुजीब मीर आलमखान
४४. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
४५. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
४६. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४७. स.स.सौ.छाया विलास राऊत
४८. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४९. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
५०. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
५१. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
५२. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
५३. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
५४. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
५५. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५६. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५७. स.स.श्रीमती खान जहुरबी नासेर
५८. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५९. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
६०. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
६१. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
६२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
६३. स.स.सौ.रेखा कैलास काथार
६४. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
६५. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६६. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
६७. स.स.श्री.खुडे विजय किसन
६८. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
६९. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
७०. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
७१. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
७२. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
७३. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
७४. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
७५. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण

७६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७७. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७८. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७९. स.स.सौ.जाधव संगीता विठ्ठलराव
८०. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
८१. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
८२. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
८३. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
८४. स.स.श्री.जोशी संजय रामदास
८५. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
८६. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८७. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८८. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
८९. स.स.सौ.अल्पा विकास जैन
९०. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
९१. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
९२. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) गुलाबचंद व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**चर्चा :**

श्री.काशिनाथ कोकाटे :महापालिकेने दोन वर्षापूर्वी जनतेच्या हिताच्या दृष्टीने एएमटी प्रवासी बस सेवा सुरू केलेली होती. बससेवा सुरू करण्यासाठी या सभागृहाने चांगला निर्णय घेतला चांगली सेवा दिली जात होती यात महापालिकेला कोणताही खर्च करण्याची गरज पडली नाही. परंतू गेल्या १० दिवसापासून बससेवा एजन्सीच्या पदाधिकारी,कामगाराच्या वादामूळे बंद पडली. कुठल्याही कर्मचाऱ्यांचा महापालिकेशी संबंध असणार नाही. व सदर एजन्सीने एकही दिवस बस सेवा खंडीत होवू देवू नये असा जो करार केला त्यात स्पष्ट दिलेले होते, असे असतांना बस सेवा दहा दिवसापासून खंडीत होवून जनतेचे हाल होत असून शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास होत आहे, ही सेवा पुन्हा तातडीने सुरू करण्यासाठी प्रशासनाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा. व ही सेवा २४ तासाच्या आत सुरू करून जनतेची गैरसोय दुर करावी.

श्री.मुजीब खान :एजन्सी व त्या एजन्सीचे कर्मचारी वाहनचालक यांचे वादामूळे बस सेवा बंद पडली हे चित्र सध्या समोर आहे. जिन्सी पोलीस स्टेशन समोर बसचे वाहनचालक इतर कर्मचारी यांचेवर दबाव टाकत होते कि.मीटर प्रमाणे महापालिकेला रॉयल्टी मिळणार होती परंतू ६० बसेसचे चैन लॉक केलेले आहे पोलीस स्टेशनला बोलतांना मी स्वत: ऐकले आहे. या संदर्भात वृत्तपत्रातही आलेले आहे याची चौकशी प्रशासनाने केलेली आहे का? माहिती द्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:मोठा गाजावाजा करून बससेवा सुरू केली. ज्या अटी व शर्ती होत्या त्यानूसार कार्यवाही होणे गरजेचे आहे. अटी शर्ती नुसार पूर्ण मॅनेजमेन्ट एजन्सीचे असल्याने कर्मचाऱ्यांना व इतर नागरीकांना सवलती देवू शकत नाही. एजन्सीकडील सेवा रद्द करून महापालिकेच्या वतीने सुरू करावी जकातीचे खाजगीकरण करीत आहे. कदाचित जकात रद्द झाली तर त्या बाबत अटी शर्ती काय सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावे.

श्री.कंवरसिंग बैनाडे :शालेय विद्यार्थी तसेच वयोवृध्द नागरीकांसाठी एएमटी बससेवा चांगली होती. बीओटीवर सेवा चालू असतांना बंद पडत असेल तर यात महापालिकेची बदनामी होते यात प्रशासन ही जबाबदार आहे असे माझे मत आहे अटी शर्ती नुसार कार्यवाही होणे अपेक्षीत आहे रॉयल्टी मिळावयास पाहिजे होती ती मिळालेली आहे का प्रशासनाने एजन्सी बरोबर चर्चा करून विस्कळीत झालेली बससेवा तात्काळ सुरू करण्याची कार्यवाही करावी. शाळांच्या मुलांची गैरसोय दुर करावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :बससेवा बंद पडल्यामूळे नागरीकांची नाराजी झालेली आहे बससेवा चांगल्या प्रकारे चालू होती. बीओटीवर देतांना त्या एजन्सीला महापालिका गॅरन्टर म्हणून आहे तसेच पूर्ण बसगाडया वापरात येतील त्यानूसार कमीत कमी वेतनाची अट त्यात दिलेली होती काय,असेल तर वाहन चालक,व इतर सर्व कर्मचारी यांना त्याप्रमाणे पगार झालेला आहे का? प्रत्येक गाडीच्या किती फेऱ्या व किती कि.मी.धावते यानूसार कि.मि.आतापर्यत गाडया धावल्या याची तपासणी आपले अधिकारी यांनी केलेली आहे का महापालिका यात मध्यस्थी असून रस्ते,जागा,पाणी तसेच महापालिका गॅरन्टर म्हणून आहे. नियमाप्रमाणे रॉयल्टी मिळाली असेल तर ताबडतोब बससेवा सुरू करावी. मध्यस्ती करून बससेवा सुरू करावी.

श्री.संतोष खेंडके :दोन वर्षापूर्वी ही सेवा सुरू केली तेव्हा शहरातील सर्व नागरीकांनी महापालिकेचे स्वागत केले. कर्मचाऱ्यांच्या समस्याला गालबोट लागत असेल तर महापालिकेने ते बघणे गरजेचे आहे बससेवा त्वरीत चालू करण्यासाठी प्रयत्न करावे.

श्री.संजय केनेकर :बससेवा सुरू करून नागरीकामध्ये चांगली भावना निर्माण झालेली होती. १०० बसगाडया देण्याचा करार केला परंतू ६८ बसगाडया सध्या धावतात. आतापर्यत किती कि.मी अंतर झाले महापालिकेला किती फायदा झाला यावर नियंत्रण असण्यासाठी कोणत्या अधिकाऱ्यावर किंवा समिती करून जबाबदारी दिली होती आजची परिस्थिती आहे. जनजिवन विस्कळीत होवून जी बदनामी झालेली आहे कुणास जबाबदार धरून कार्यवाही करणार आहे.

सौ.अजरा जबीन खॉन :एएमटी बस सेवा ही नागरीकांसाठी फायद्याची व जनहिताची सेवा आहे. बससेवा बंद पडल्यामूळे नागरीकांना त्रास होतो. ज्यांनी बंद केली त्यांना अशी संधी मिळू नये त्याचे समस्याकडे लक्ष द्यावे. नियमानूसार कार्यवाही व्हावी बससेवा पुन्हा सुरळीत होण्यासाठी प्रयत्न करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :सुरू केलेली बससेवा ही नागरीकांसाठी उत्कृष्ठ,दर्जेदार व लोकांच्या चांगल्यासाठी होती. हेच मत सभागृहाचे आहे. नागरीकाची गैरसोय होत आहे बंद होणे परवडणार नाही. बससेवा बंद होत असल्याने पुन्हा सुरूवातीपासून कार्यवाही करावी लागते. शहरात १०० गाडया धावणार यावर नियंत्रन ठेवण्यासाठी अधिकारी नगरसेवकांची एक परिवहन समिती असणे गरजेचे होते ती केलेली नाही अटी शर्ती काय होत्या त्याची अमलबजावणी

होते की नाही याकडे लक्ष नव्हते. ही सेवा चालू करावी त्यानंतर कायम ही सेवा चालू राहिल त्यासाठी नियंत्रण समिती नियुक्त करावी.

श्री.अ.रशिद खान :करारनाम्यानुसार १०० बसगाडया देणार होते ६८ गाडया दिलेल्या आहे सदर एजन्सीवर ॲक्शन घेतलेली आहे का? जकातवर जसे एक अधिकारी नियंत्रक म्हणून नियुक्त केले त्याप्रमाणे बससेवेच्या साठी आहे का? पाच सहा दिवस उलटले बससेवा चालू नाही यात प्रशासनावर राजकीय दबाव येतो काय बँक गॅरन्टी दिली गाडी खराब झाल्या किंवा बसगाडया सोडून गेले तर जुनी गाडी कमी किमतीत विकेल. महापालिका जबाबदार असणार काय? नियमानुसार जो पगार कर्मचाऱ्यांना दिला जातो तो मिळाला की नाही ही महापालिकेची जबाबदारी आहे पगार वाटपाच्या वेळी महापालिकेचे अधिकारी असावयास पाहिजे वेतन कमी मिळते का ते पहावे.

श्री.सलीम खान :बससेवा खाजगी तत्वावर देण्यासाठी माझा विरोध होता. दोन वर्षात एजन्सीने बसेसचे खोके करून ठेवले रस्त्यावर धावण्यास सक्षम राहिलेली नाही. एजन्सी काम सोडून जाण्याची तयारी दर्शवित असून दोन वर्षात महापालिकेला फायदा झाल्याचे दिसून येत नाही यास जबाबदार कोण? मंत्रिमंडळाच्या बैठकीत जकात नाका रद्द होणार असा निर्णय झाल्याचे सम्राट पेपरला वाचले. असे झाले तर ठेकेदाराकडून किती रक्कम वसूल करणार रिटेंडर करावे महापालिकेचा फायदा होईल. प्रत्येक वर्षी एकाच एजन्सीला जकात वसूलीचा ठेका कसा व कुणामुळे दिला जात आहे. १४० ते १५० कोटीमध्ये जाऊ शकेल.

श्री.विनायक पांडे :आपतकालीन सेवा म्हणून ३२ बसेस आजही चालू आहे. उर्वरीत बसेस बंद न ठेवता खाजगी किंवा महापालिकेचे वाहनचालक देवून बससेवा कशी चालू करता येतील याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आताच चर्चा झाल्याप्रमाणे इतर बाबींवर नंतरही चर्चा करून निर्णय घेता येईल. बससेवा पूरेशी नसल्याने शालेय विद्यार्थी तसेच नागरीकांची रिक्षाधारक लूट करीत आहे त्वरीत बससेवा सुरू करण्याचे आदेश करावेत.

मा.महापौर :ज्यासुचना स.सदस्यांनी केलेल्या आहेत त्याबद्दल मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :ज्या बसेस चालू होत्या त्या १०० टक्के चालू करणे जास्त महत्वाचे वाटते. १०० पर्यंत बसेस वाढविण्याची गरज आहे २१ बसेस धावतात. २-३ दिवसात ७० बसेस धावतील १०० बसेसची आवश्यकता आहे. बससेवा बंद पडली असे नाही. काही कामगारांनी अनधिकृतरित्या संप करून सेवा चार पाच दिवसापासून विस्कळीत केली त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला यानंतर दोन चार मुद्दे समोर आले त्यात सदर कर्मचारी यांनी अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून हा प्रकार केला काय? एजन्सीनेही कॉन्ट्रॅक्टर मार्फत हे कर्मचारी घेतलेले आहे हा विषय चर्चेला आला त्यावेळी महापालिकेनेही याची चौकशी करायवयास पाहिजे. करारनाम्यात दिले की त्यांना मिनिमम वेजेस व इतर कायदयाचे पालन करणे बंधनकारक राहील. पीएफ किंवा इएसआय देत नाही मुद्दा समोर आला होता त्याबद्दल १०० टक्के तपासणी करून घेतले. नोव्हें.२००७ पर्यंतचे पीएफ इएसआयचे पूर्ण पैसे भरण्यात आलेले आहे. गाडयाचे सामान काढून दुसरे टाकले जाते असे म्हणणे चुकीचे होईल कारण कोणतीही गाडी आरटीओ कडून पासींग होवून आल्यानंतर रस्त्यावर चालविता येते. पगार वाढ करून देण्याचा प्रश्न महापालिकेशी निगडीत नाही

परंतू नियमानुसार पगार कमी देणे योग्य नाही. बस सेवा चालू होईल परंतू यापूढे दर सहा महिण्याला ऑडीट करून घेणार आहे खाजगी सी.ए.नेमण्यात येईल. टेक्नीकली दर सहा महिण्याला गाडीचे पण ऑडीट करायचे आदेश काढलेले आहे. यापैकी फायन्शीयल ऑडीट झालेले आहे पीएफ आणि इएसआयचे नोंव्हेबर २००७ पर्यंन्त पेमेंन्ट मुख्यलेखाधिकारी यांना हे काम दिले होते त्यांनी प्रमाणीत केलेले आहे. रॉयल्टी बाबत जेंव्हा पेमेंन्ट घेतो रूट प्रमाणे एनओसी घेतो त्याप्रमाणे बसेस चालू आहे. प्रत्येक रूटचे अंतर माहित आहे. कदाचित एक दोन फेऱ्या जास्त होवू शकतात. त्यासाठी जीपीआरए सिस्टम लावण्याबाबत फोर्स करीत आहे त्यामूळे कोणती गाडी कोणत्या वेळी कुठे आहे हे कळेल. हे करण्यास एक महिना लागेल. बँक गॅरन्टी बाबत एजन्सीने २० टक्के रक्कम दिली आहे ८० टक्के बँक गॅरंन्टी केलेली आहे. तसेच दर दोन वर्षानंतर एप्रिल मध्ये ज्या बँकेकडून कर्ज घेतले आहे त्याचे ॲप्रुड व्हॅल्यूअर कडून व्हॅल्यूएशन करणार व्हॅल्युएशन जर कर्ज पेक्षा कमी निघाले तर उरलेल्या रक्कमेला सदर एजन्सीने महापालिकेला बँक गॅरन्टी द्यावी. कोणत्या क्षणी कर्ज जास्त व गाडीचे व्हॅल्यू कमी असायला नको. दोनवर्ष आणखी झालेले नाही व्हॅल्यूएशनची करारनाम्यात अटी व शर्ती टाकलेल्या आहे त्यानूसार कार्यवाही होईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :जे कर्मचारी काम करतात त्यांना मिनीमम वेजेस दिले जाते की नाही याची खात्री कोण करते. अनेक वेळा असे केले जाते की सरकार दरबारी पीएफ वगैरे भरणा केले जाते परंतू त्या कर्मचाऱ्यांना पगार कमी दिला जातो.

मा.आयुक्त :प्रत्येक कर्मचाऱ्यांनी किती तास काम केले याचे ऑडीट करण्याचे आदेशीत केलेले आहे. त्यासाठी सी.ए. ची नियुक्ती करावयाची आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे :एजन्सीच्या नावे पीएफ न भरता जे कर्मचारी असतील त्यांचेच नावाने पीएफ भरणा करता येतो.

मा.आयुक्त :आता बसेस सुरू करण्याची जबाबदारी त्या एजन्सीची आहे. अनधिकृतरित्या संप केला महापालिकेच्या कामकाजात अडथळा आणला म्हणून गुन्हा दाखल केला सेवेत कायम करून घेवू असे आमिष कर्मचाऱ्यांना दाखविले जात आहे असे प्रशासनाचे मत आहे. परंतु ते कधीही शक्य नाही. त्यांचा गैरसमज करून त्यांची फसवणूक करीत आहे फक्त जड वाहनाचे लायसन्स असेल तर चालविता येत नाही यासाठी त्या वाहन चालकाकडे बॅचेस असायला पाहिजे. यापूर्वी एक दोन दिवसात आरटीओकडून बॅचेस मिळवून घेतले त्यामूळे ३१,३२ बसेस चालू करता आल्या होत्या. महापालिकेकडे जास्तीचे दैनिक वेतनावरील वाहनचालक असेल तर त्यांना बॅचेस मिळवून देवून व तात्पुरते त्यांची नेमणूक करून बससेवा सुरू करण्याची कार्यवाही करू त्याचे पेमेंन्ट एजन्सी करेल. २६ जानेवारी पासून आणखी तीन बसेस सुरू होत आहे. नवीन रूटसाठी आणखी टेंडर काढू शकतो परंतु पुर्णच पुन्हा टेंडर काढायचे असेल तर दीड महिना लागेल. त्याऐवजी जी बससेवा चालू होती त्यांना मदत करून बससेवा सुरू करण्या बाबत तसेच आणखी बसेस वाढविण्यासाठी प्रयत्न करू.

श्री.प्रशांत देसरडा :बससेवा चालू करण्यासाठी प्रशासनाने काय प्रयत्न केलेले आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:ज्यांनी संप केला ते दोन वर्षापासून २५०० रू.वेतनावर नोकरी करीत आहे त्यांचे कुटूंबीयांच्या रोजी रोटीचा विचार करून प्रशासनाने एजन्सीशी चर्चा करून योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न केला का? सदर कर्मचारी यांना किती

पगार द्यायला पाहिजे किती दिला जात होता याची चौकशी केलेली आहे. का मागच्यावर्षी किती उत्पन्न झाले काय सवलत देण्यात येते याची माहिती द्यावी.

श्री.कवरसिंग बैनाडे :सदर कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याची जबाबदारी महापालिकेची येत नाही. त्या कर्मचाऱ्यांचा एजन्सीशी डायरेक्ट संबंध येतो.

श्री.सय्यद खुसरो :जो करारनामा एजन्सी बरोबर केलेला होता त्यात काय अटी शर्ती तसेच कोणत्या सुविधा द्यायच्या होत्या योग्य खुलासा करावा. सभागृहाची दिशाभूल करू नये.

मा.आयुक्त :हा दुय्यम प्रश्न असला तरी अटी शर्तीनुसार पार्कींगसाठी जागा दिली याशिवाय काहीच सुविधा देत नाही. कर्मचाऱ्यांचे संबधीत थेट दोन तीन मुद्दे होते मिनीमम पगार एजन्सीने द्यायला पाहिजे तितकी जबाबदारी पार पाडू त्यापेक्ष जास्त पगार पाहिजे असेल तर तो एजन्सीशी संबंध येतो महापालिकेला येत नाही. बससेवा बंद पडली असा भाग नाही दोन चार दिवसात सुरू करण्याचे प्रयत्न होईल. एजन्सीला काहीच देत नाही.

हा संप पूर्णपणे अनधिकृत होता. यात दोन तीन पर्याय काढता येतील बससेवा सुरू करण्यासाठी दुसरे टेंडर काढू शकतो जो काही अनधिकृतरित्या संप झाला त्या बाबत जी काय कार्यवाही करायची ती एजन्सीने करावी परंतु बससेवा सुरू करावी. तिसरे असे की रॉयल्टी महत्वाची नाही बससेवा सुरू होणे आवश्यक आहे परंतू सात आठ दिवस जी बससेवा बंद होती त्या कालावधीची पूर्ण रॉयल्टी एजन्सीने भरावी. रॉयल्टीचे १०० टक्के ऑडीट करून घेतले जाईल.

श्री.भगवान घडमोडे :अटी शर्ती नुसार रॉयल्टी वसूली होईल परंतू बसेस कशा सुरू होतील यासाठी काय कार्यवाही करणार आहे.

मा.आयुक्त :विधीज्ञाचा सल्ला घ्यावा जुने वाहनचालक येत नसेल तर नवीन भर्ती करून त्यांना बॅचेस मिळवून देवून तात्काळ बससेवा सूरू करण्याच्या सुचना दिलेल्या आहे. जर बससेवा सुरू केली नाही तर त्या एजन्सीला दंडात्मक कार्यवाही होईल नव्याने टेंडर काढता येईल.

सौ.लता दलाल :कोणती एजन्सी ही सेवा चालविते याबाबत काही देणे घेणे नागरीकांना नाही परंतू महापालिकेच्या माध्यमातून सुरू झालेली ही सेवा आहे हे नागरीक आम्हाला विचारतात बससेवा सुरू करण्यासाठी लक्ष देण्याची गरज आहे. सदर कर्मचाऱ्यांना वाजवी पेक्षा दैनिक वेतन कमी मिळत असेल तर त्यासंबधी तपासणी महापालिकेने करावयास पाहिजे होती. या महापालिकेत परीवहन समिती नियुक्त करण्याची गरज आहे त्यामूळे अशा समस्या निर्माण होणार नाही.ज्यांनी संप केला तो का केला याचा योग्य तो विचार करून जे लोक जेलमध्ये आहे त्यांची शिक्षा परत घेवून त्यांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय देवून पून्हा कामावर घेण्याची कार्यवाही करून पूर्ववत बससेवा सुरू करावी.

श्री.अ.रशिद खॉन :या कर्मचाऱ्यांना पगार वाढ देवून पुन्हा कामावर घेतल्यास सहा महिण्यानंतर पून्हा संप करतील. आरटीओ कार्यालयात नवीन गाडी पासींगसाठी गेल्यानंतर पासींग होवून आल्यानंतर त्या गाडीचे पार्ट जुन्या गाडीला बसविण्याचा प्रकार होतात असे प्रकार होऊ नये यासाठी नियंत्रण ठेवण्यासाठी कोणते अधिकारी यांनी नियुक्ती केलेली आहे. जे कर्मचारी जेल

मध्ये गेलेले आहे त्यांचेशी मा.आयुक्त यांनी त्यांचे काय समस्या होत्या चर्चा करावी त्यांना न्याय द्यावा.

मा.आयुक्त :बसेसचे पण टेक्नीकल ऑडीट करून घेण्यात येईल. श्री.जी.बी.सोनी यांना सुपरवायझर म्हणून काम दिलेले आहे.

श्री.कंवरसिंग बैनाडे :ज्यांनी संप केला त्यांनी तशी अगोदर नोटीस वगैरे दिलेली होती का दिली नसेल तर जो संप केला तो कायद्यात बसत नाही. त्या कर्मचाऱ्यांची चूक असेल तर त्यांना न्याय देण्याची व सहकार्याची भावना ठेवू नये. सहानुभूती दाखवू नये.

श्री.अ.रशीद खान :ठेकेदार त्यांचे पगारातून पैसे घेतात. त्यांना कमी पगार मिळतो म्हणून त्यांनी पोटासाठी संप केला त्यात चूक काय. ठेकेदाराची चूक असेल तर त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

मा.आयुक्त :कामगाराचे लिडर आहेत ते कामगारांना,महापालिकेला तसेच नागरीकांना वेठीस धरत आहे त्या कर्मचाऱ्यांना तुम्हाला सेवेत कायम करू असा गैरसमज पसरवित आहे असे माझे वैयक्तीक मत आहे. त्यामूळे त्या कर्मचाऱ्यांचेच नुकसान होत आहे जेल मध्ये गेले कुणालाही चांगले वाटत नाही. त्यांना वाजवी पेक्षा कमी वेतन मिळणे योग्य नाही. आतापर्यंत चौकशी केली नाही परंतू आता दर सहा महिण्याला ऑडीट करून त्या कामगारांना बरोबर व योग्य पेमेन्ट मिळते की नाही याची शहानिशा केली जाईल. सेवा न करता त्यांचे मागण्यासाठी लोकांना वेठीस धरत असतील तर योग्य नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :सदर एजन्सी बरोबर करारमाना केलेला आहे. त्याच एजन्सीला त्वरीत चर्चेसाठी बोलवून त्यांचेकडून ही सेवा सुरळीत करून घ्यावी. चौकशी वगैरे नंतर करता येईल.

मा.महापौर :प्रथम ही बससेवा सुरळीत चालू करण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे. या सेवेवर अनेक शहरातील नागरीक अवलंबून असून सोयीची सेवा आहे. आताच मा.आयुक्त यांनी खुलासा केला त्यावर प्रशासनाने ठाम राहून जास्तीत जास्त बसेस रस्त्यावर कशा धावतील व ही सेवा सुरळीत कशी होईल याकडे बघणे गरजेचे आहे. ज्या तक्रारी कर्मचाऱ्यांच्या आलेल्या आहे नैतिक कर्तव्य म्हणून त्या बघीतल्या पाहिजे. संप केल्यामूळे शहरातील नागरीकांना त्रासदायक झालेले होते संप करून नागरीकांना वेठीस धरू येवे नये यासाठी जे संपावर गेलेले होते त्यांनी कामावर यावे व त्यांचे मागण्या त्यांनी त्या त्या लोकांकडे मागाव्या. असे आवाहन करण्यात येते. बस सेवा सुरळीत होण्यासाठी प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:व्हॅट लागल्यास नाका रद्द होणार आहे का? ठेकेदाराकडून किती रक्कम घेणार आहे.

श्री.प्रशांत देसरडा :गेल्या चार वर्षापासून जकात रद्द करू व व्यापाऱ्यांना न्याय देवू असे आश्वासन देत आहे. त्यामूळे या वर्षी जकात रद्द होईलच असे नाही शासन याबाबत कुठलाही निर्णय घेवू शकत नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :जकात रद्द झालीत तर नियम काय ठेवलेले आहे याचा खुलासा मागविलेला आहे.

मा.आयुक्त :जकात रद्द झाल्यास त्यासाठी अट ठेवलेली आहे जर असे झाले तर व रद्द करण्याचा निर्णय जेंव्हा जाहीर झाला त्या निर्णयामध्ये व जकात रद्द करण्याची जी तारीख आहे यामध्ये एक महिन्यापेक्षा जर कमी अतंर असेल ज्यातारखेपर्यत जकात आहे त्या तारखेपर्यत जकात एजन्सीने महापालिकेला

रक्कम द्यायची जर जाहिर झाल्याची तारीख व त्या तारखेपासून बंद होत आहे. यामध्ये एक महिण्यापेक्षा जास्त अंतर असेल शेवटच्या एक महिण्यामध्ये त्या एजन्सीने वसूल करायची व पूर्ण जकात महापालिकेला द्यायची त्यावर ५ टक्के कमीशन चार्जेस दिले जाईल. ही अट मागच्या वर्षी ही टाकलेली होती.

श्री.सलीम खान :अटी शर्ती करण्याचा अधिकार महापालिकेला आहे का ?चार टेंडर आले जनतेचा यात फायदा होवू शकतो रिकॉल केल्यास १४०, १५० कोटीचे टेंडर येवू शकते. परंतू कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेचा फायदा सोडला.

श्री.किशनचंद तनवाणी :स.सदस्य श्री.सलीम खान हे अपमान करीत आहे. आरोप करीत आहे त्यांचे सभासदत्व रद्द करावे.

याच वेळी मा.महापौर यांचे डायस समोर स.सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर. :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

(याच वेळी सर्व सदस्य आपआपल्या जागेवर बसतात.)

श्री.काशिनाथ कोकाटे :सिडको हडको भागात मालमत्ता कर हा ६.५० रू.स्क्वे.मी. प्रमाणे लावण्यात आला त्या ऐवजी ५रू.आकारण्यात यावा असा सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला असतांना सन २००६-०७ व २००७-०८ या वर्षाच्या ज्या नोटीसा पाठविल्या त्या चुकीच्या पाठविल्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाची अमलबजावणी करावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :स्पेक एजन्सीने सर्वे करून नोटीसेस मालमत्ता अधिकारी यांचेकडे देणे आवश्यक होते. जो निर्णय झाला असेल त्याप्रमाणे दर आकारून नोटीसेस द्यायला पाहिजे. खाजगी एजन्सीला नोटीस देण्याचा अधिकार नाही. हे काम वार्ड अधिकारी यांचेकडे सोपवता आले तर योग्य होईल. जे मुख्य अधिकारी असतील त्यांना ठराविक दिवस ठरवून त्यांनी सिडको कार्यालयात बसावे जेणे करून जनतेचे प्रश्न सुटतील वार्ड अधिकारी यांना अतिक्रमणाच्या संदर्भात अधिकार द्यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:एनआरव्ही नुसार जो कर निश्चित केला तो कधीही केंव्हाही कमी जास्त करता येत नाही या सभागृहाला अधिकार नसून शासनाचे अधिकार आहे. कमेटी करून या संबधी कायदेशीर बाबी तपासून निर्णय घ्यावा.

श्री.कंवरसिंग बैनाडे :कर भरण्यास कुठल्याही नागरीकांचा नकार नाही. परंतू गेल्या दोन वर्षापासून सिडको महानगरपालिकेकडे हस्तातंरण झालेले आहे. ५रू. स्क्वे.मीटर प्रमाणे सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे त्याप्रमाणे नोटीस पाठवाव्यात यामूळे १०० टक्के वसूली होईल. सारख्याच आकाराचे घरांना कमी जास्त कर आकारणी केल्यामूळे टॅक्स भरणा करण्यास नागरीक पूढे येत नाही. काही घराचा टॅक्स भाडेकरूच्या नावाने आलेला आहे. सर्वसाधारण सभेच्या निर्णयाची अमलबजावणी करावी. रू.५/- स्के.मी.प्रमाणे सिडको हडको भागातील मालमत्ता टॅक्स आकारणी व्हावी.

सौ.मेहरून्नीसा खान :स्पेकचा ठेका रद्द करण्याचा यापूर्वी निर्णय घेतलेला होता अंमलबजावणी केली नाही बील देण्यात येवू नये असा निर्णय घेतला तरीही बील दिले. स्पेकने चुकीचा सर्वे केला त्यांना बील देण्यात येवू नये. नवीन एजन्सीकडून सर्वेचे काम करून घ्यावे सर्वेसाठी टेक्नीकल कर्मचारी असावे ही अट टाकावी. वाजवी पेक्षा जास्त टॅक्स आकारू नये.

सौ.रजनी जोशी :हस्तांतरण करून सिडको हडको भागातील नागरीकांना महापालिकेकडून पुरेशा सुविधा मिळत नाही. जो कर आकारणी केली जास्त आहे या भागातील मालमत्ता जास्त असून वसूलीही मोठया प्रमाणात होते. सर्वसाधारण सभेने ५रू. स्क्वे.मी.प्रमाणे टॅक्स आकारण्याच्या निर्णयाची अमलबजावणी करावी.

श्री.देसरडा प्रशांत :सिडको हडकोतील मालमत्ताना सर्वसाधारण सभेने ५रू.स्क्वे.मी. प्रमाणे टॅक्स आकारण्याचा निर्णय घेतला त्यांची अमलबजावणी होणार की नाही. जकात वसूली टेंडर काढण्या अगोदर या सर्वसाधारण सभेपूढे अंदाजपत्रक ठेवले जाईल असा ठराव या सभागृहाने मागिल वर्षी घेतला होता असे असतांना जकात वसूलीचे टेंडर स्थायी समितीला मंजूर झाले या सभागृहासमोर कोणताही प्रस्ताव आला नाही. मी पत्र देवून खुलासा मागविलेला होता जकातीचे टेडर काढल्यानंतर मला उत्तर देण्यात आले. एखादा अक्षेप आला असेल तर त्यानंतर सर्व प्रक्रिया व्हायला पाहिजे. ५ रू.प्रमाणे सर्वसाधारण सभेने टॅक्स लावण्याचा निर्णय घेतला असतांना ६.५० रू.प्रमाणे आकारणी केली जाते या सभागृहापेक्षा प्रशासन सर्वश्रेष्ठ आहे का असा प्रश्न सदस्यांना पडतो. अनेक निर्णय सभागृहाने घेतल्यानंतर कार्यवाही होत नाही. स्पेक एजन्सीचे सर्वेक्षण करण्याचे काम कोणत्या स्वरूपाचे होते त्याची माहिती व किती दिवसात ते काम करायचे होते असा प्रश्न विचारला होता उत्तर मिळाले की संगणकीकरण करणे,घर क्र.करणे,कर आकारणी करणे,वार्ड व घराचे नकाशे करणे,जुन्या मिळकतीत नवीन सर्वेक्षणातून लिंक करणे,नोटीस तयार,डिमांड बिल तयार,वाटप करणे, महापालिकेच्या सर्व मालमत्ताचे अभिलेख संगणकीकरण करणे. व महापालिकेच्या कर्मचाऱ्यांस प्रशिक्षण देणे. याची दखल आताच घेतली तर त्या एजन्सीवर पोलीस गुन्हा दाखल होवू शकतो. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी डिमांड बिल वाटप केलेले आहे उर्वरीत कोणतेही काम या एजन्सीने केलेले नाही. या एजन्सीला किती बिल दिले असा प्रश्न केला असता अंदाजे ९० लक्ष दिल्याचे कळविले. अट अशी होती की १०० टक्के या एजन्सीने काम केल्यानंतर महापालिकेचे अधिकारी तपासणी करतील त्यानंतर २५ टक्के बिल अदा करता येईल. दि.१५-२-२००५ रोजी १५ लक्ष, दि.२७-२-२००६रोजी १०लक्ष,दि.२३-३-२००६ रोजी १० लक्ष,दि.६-१०-२००६ रोजी २५ लक्ष,दि.४-१-२००७ रोजी १३.२४ लक्ष,दि.१२-१-२००७ रोजी २५ लक्ष तर दि.१६-८-२००७ रोजी २०.४८ लक्ष, असे एकूण ९० लक्ष देवून एकही बील १० लक्षपेक्षा कमी नाही. एकही काम या एजन्सीने पूर्ण केले नाही. कोणतेही काम करून घेतांना त्या एजन्सीने किती टक्के काम केल्यानंतर किती रक्कम अदा करावयास पाहिजे याचे नॉर्मस ठरलेले असते. परंतू तसे स्पेक एजन्सीला बील देतांना विचार केलेला नाही. मी पत्र दिल्यानंतर बँक गॅरन्टी नोंदणीकृत करून घेतली.

(याच वेळी मा.उपमहापौर हे मा.महापौर यांचे आसनावर बसतात.)

श्री.प्रशांत देसरडा :ज्या कर्मचाऱ्यांनी सर्वेचे काम केले त्याची यादी मागीतली दिली नाही फॅक्सद्वारे कळविले काम सन २००६ मध्ये दिले यादी २००४ ची दिली जाते. किती कालावधीसाठी काम दिले होते किती वेळेस मुदतवाढ दिली कारण काय असा प्रश्न केला परंतु स्पेकला मुदतवाढ का दिली खुलासा मिळाला नाही. प्रशासन व स्पेक एजन्सीचे मिळून या शहरातील नागरीकांची लुट

केली ९० लक्ष रूपये काम न करता वाया गेले. दोन वर्षापूर्वी सर्वेचे काम करून द्यायचे होते त्यामूळे १० ते १४ कोटी रू. दर वर्षी असे जवळपास २० कोटी वाढीव मालमत्ता करातून मिळाले असते ते प्रशासनाच्या चुकीमूळे महापालिकेचे नुकसान झालेले आहे. अशा एजन्सीना रोखावे नसता अनेक एजन्सी जनतेचा टॅक्स लुटण्यासाठी तयार आहेत. स्पेक एजन्सीच्या कामाची चौकशी व्हावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जागेच्या बीओटीचे कामे वगळून इतर बीओटीवर जी कामे केली आहे असफल झालेली आहेत.

मा.आयुक्त :सिडको हडको भगातील मालमत्तांना कराचे दर आकारणी करण्याचा प्रस्ताव २० फेब्रुवारी पूर्वी पास होणे आवश्यक असते त्यानंतर पूढील वर्षासाठी त्याची अमलबजवणी करता येते सन २००७-०८ साठी लिगली लागू करता येणार नाही पूढील वर्षी २० फेब्रुवारीच्या पूर्वी प्रस्ताव ठेवला त्यावेळी तसा निर्णय घेतला तर २००८-०९ साठी कार्यवाही करता येईल.

(याच वेळी मा.महापौर पिठासीन अधिकारी म्हणून आसनग्रहन करतात.)

श्री.अ.साजेद अ.सत्तार :निर्णय घ्यायचे नसेल तर सभा तहकूब करावी.

श्री.किशनचंद तनवाणी :सभा तहकूब करू नये विषय पत्रिका घेण्यात यावी.

श्री.संतोष खेंडके :विषय पत्रिका घेण्यात यावी.

(याच वेळी अनेक सदस्य मोठमोठमोठयाने डायस समोर जावून बोलत होते काहीही ऐकू येत नव्हते.)

मा.महापौर :आजची सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबरच सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सर्वसाधारण सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०४)**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१(एच) आणि (आय) अन्वये

**दिनांक :- १०/०१/२००८**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१ (क) अन्वये **मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांनी शुक्रवार दिनांक १८/०१/२००८ रोजी दुपारी ३.०० वाजता** औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिका प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजीत केली आहे.

प्रायोजित सभेत निम्ननिर्दीष्ट विषय पत्रिका निर्णयाधिन आहे.

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारित वेळी उपनिर्दीष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

**वृत्तांत कायम करणे**

**विषय क्र. ६३ :**

दिनांक २६.१०.२००७, २९.१०.२००७, २०.११.२००७ आणि २०.१२.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

(प्रश्नांची यादी सोबत जोडण्यांत आलेली आहे.)

प्रशासकीय प्रस्ताव

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक १८.०१.२००८ रोजी आयोजित सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे</u>**

**श्री.किशनचंद लेखराज तनवाणी,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.१३ :**

०१. मनपा हद्दीमध्ये एकुण किती पेट्रोल पंप, डिझेल पंप,गॅस पंप आहेत. यापैकी किती पेट्रोल पंप,डिझेल पंप,गॅस पंप यांना मनपाने परवानगी/ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

**मुख्य अग्निशमन अधिकारी**

**उत्तर :**

एकुण ४० पंप आहेत त्यापैकी ३३ पंपास नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

०२. मनपा हद्दीत किती पेट्रोल पंप, डिझेल पंप, गॅस पंप हे मनपाच्या विना परवानगीने/ अनधिकृतरित्या चालू आहे. व याबद्दल मनपाने काय कार्यवाही केली आहे.

**उत्तर :**

बी.पी.एम.सी.ॲक्ट १९४९ चे कलम ३७६ (ए) नुसार नाहरकत प्रमाणपत्र न घेणाऱ्या व विनापरवाना पंपास वेळोवेळी नोटीस देऊन कळविण्यात आले आहे.

०३. मनपा हद्दीमध्ये धोकादायक पेट्रोल पंप, डिझेल पंप, गॅस पंप किती आहेत व अशा धोकादायक पेट्रोल पंप,डिझेल पंप,गॅस पंपच्या संदर्भात मनपाने काय कार्यवाही केली.

**उत्तर :**

बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ चे कलम ३७६ (ए) नुसार एकुण ५ पेट्रोल पंपास धोकादायक म्हणून घोषीत करण्यात आले होते व त्यापैकी दोन पंपांनी फायर एन.ओ.सी. घेतली आहे. तीन पंप बाकी आहेत व धोकादायक घोषीत केले या बाबतची माहिती मा.जिल्हाधिकारी व उप आयुक्त (पोलीस) तसेच कंपनीचे सेल्स ऑफीसर यांना आदेशामार्फत कळविण्यात आले आहे व ते आदेश क्र.यादी सोबत जोडण्यात आले आहे.

०४. वरीलप्रमाणे कार्यवाही केली नसेल तर, कार्यवाही न करण्याचे कारणे काय व यास जबाबदार कोण.

**उत्तर :**

याबाबत पुढील कार्यवाही मा.पोलीस आयुक्त कार्यालय औरंगाबाद व मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद खात्याकडून होणे अपेक्षीत आहे.

मनपा अग्निशमन विभागातर्फे पेट्रोल/ डिझेल पंपानाही ना हरकत प्रमाणपत्र देणे एवढया पर्यंतच कार्यवाही केली जाते परंतु परवाना देणे मा.पोलीस आयुक्त यांचे अधिकार आहे.

**श्री.कैलास गायकवाड,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.१४ :**

०१. बीड बायपासच्या शेजारी असलेले शहानगर,हिनानगर,अब्रार कॉलनी,पटेलनगर हा भाग महानगरपालिका हद्दीत येतो का?

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)**

**उत्तर :**

बीड बायपास शेजारील पैकी शहानगर,अबरार कॉलनी व पटेलनगर भाग महानगरपालिका हद्दीत समाविष्ट आहे. तथापी हिनानगर वसाहत भागात आढळुन आली नाही.

०२. सदरील भागात महानगरपालिका कडून विकासाची कामे होतात काय?

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)**

**उत्तर :**

उक्त नमुद वसाहती अनाधिकृत असून, गुंठेवारी अंतर्गत वसाहती नियमित झाल्यास कामे हाती घेता येतील.

**उप अभियंता (इमारती व उद्यान बांधकाम)**

**उत्तर :**

या उप विभागाअंतर्गत सदरील ठिकाणी कुठल्याही प्रकारचे विकास कामे केली नाहीत.

०३. विकास कामे केलेली नाही तर का करण्यात आली नाही?

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)**

**उत्तर :**

वसाहती अनाधिकृत असल्याने विकास कामे करण्यात आलेली नाही.

करीता माहितीस्तव सादर.

**उप अभियंता (इमारती व उद्यान बांधकाम)**

**उत्तर :**

सन २००७-०८ या अर्थसंकल्पीय पुस्तीकेत सदरील ठिकाणच्या कामासाठी कुठल्याही प्रकारची तरतुद उपलब्ध नाही.

**निवडणूक विभाग प्रमुख**

**उत्तर :**

१ औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मतदारांची नावे दि.१५ फेब्रुवारी २००५ रोजी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात अस्तीत्वात असलेल्या राज्य विधानसभा मतदार याद्या प्रभागनिहाय विभागुन मतदार याद्या तयार करण्यात आलेली होती.

२ मा.राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश जा.क्र.रानिआ/मनपा-२००६ प्र.क्र.१९/का-५ दि.४ एप्रिल २००७ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत निवडणुक नियम क्र.५२ मधील तरतुदीनुसार औरंगाबाद महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००५ चे साविधानिक व असविधानीक लिफाफे व मत पत्रिका नष्ट करण्यात आलेले आहे.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सर्वसाधारण सभा**

**पुरवणी विषय पत्रिका**

**दिनांक :- १४.०१.२००८**

(मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि 'ड' चे प्रकरण -२ आणि नियम -१ (ज) अन्वये)

शुक्रवार दिनांक १८.०१.२००८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी पुरवणी विषय पत्रिका पाठवित आहोत.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद**
**दिनांक १८.०१.२००८ च्या सर्वसाधारण सभेसाठी**
**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ९४ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद, प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहरास ४०० वर्षांपुर्वीचा इतिहास आहे व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अजिंठा, एलोरा, दौलताबाद किल्ला या जिल्हयातच आहे. यामुळे हे शहर आंतरराष्ट्रीय स्तरावर ऐतिहासिक शहर म्हणून गणना केली जाते.

महानगरपालिका व इनटॅक (INTACH) यांचे विद्यमाने २५.०० कोटींचा मेगा हेरिटेज टूरिस्ट डेस्टिनेशन देश व आंतरराष्ट्रीय महत्वाचा ङिपी.आर. तयार करण्यात आलेला आहे, या प्रकल्पाकरीता केंद्र शासनामार्फत आवश्यक निधी उपलब्ध करणेकरीता प्रयत्न करण्यात येतील, तसेच सदर प्रकल्प उभारणी नंतर महानगरपालिकेस उपयुक्त व मौल्यवान (Asset) निर्माण होईल त्यातुन देखभाल केली जाईल.

डि.पी.आर.मंजुरी,निधी उपलब्धतेबाबत केंद्र शासनाशी आवश्यक M.O.U.(Memorundum of Understanding) करणेकरीता आयुक्त महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेबाबत प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

सभागृहात आलेले दिनांक ३१.०१.२००८ च्या सर्वसाधारण सभेसाठी ऐनवेळचे विषय खालीलप्रमाणे-------

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०४)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१(एच) आणि (आय) अन्वये

**दिनांक :- १६.०१.२००८**

मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांनी शुक्रवार दिनांक १८.०१.२००८ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिका प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजीत केली आहे. प्रायोजीत सभेत निम्ननिर्दीष्ट विषय पत्रिका निर्णयाधिन आहे.

**विषय क्र. ६३ :**

दिनांक २६.१०.२००७, २९.१०.२००७, २०.११.२००७ आणि २०.१२.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**विषय क्र. ६४ :**

घन कचरा व्यवस्थापन प्रकल्पासंबंधी धोरणात्मक निर्णय घेणे संबंधी.

**विषय क्र. ६५ :**

वार्ड क्र.७६ अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेचे कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**विषय क्र. ६६ :**

मनपाच्या सिध्दार्थ उद्यान येथे खेळणी दुरूस्ती, जमीन सपाट करून लॉन विकसित करणे, सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देणे इ.साठी १ वर्षाच्या कालावधी करीता खाजगी एजन्सीकडून/बी.ओ.टी. धारकाकडून ऑफर मागविणे बाबत.

**विषय क्र. ६७ :**

वार्ड क्र.६० मो.सिल्लेखाना ते थेट वरद गणेश मंदीर पर्यंत ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी स्वतंत्र जलनिःसारण वाहीनी टाकणे या कामाच्या अतिरीक्त बाबीसाठी इतर कामासाठी असलेल्या तरतुदीतून रक्कम वळती करणे.

**विषय क्र. ६८ :**

सिडको भागातील खोलगट रस्त्यांवरील पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी रस्त्याची दुरूस्ती करणेच्या कामाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**विषय क्र. ६९ :**

वार्ड क्र.९४ शाहू नगर भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.

**विषय क्र. ७० :**

सर्वसाधारण सभा विषय क्र.६९६/१० दिनांक २०.०१.२००७ नुसार विजयनगर व विद्यानगर या दोन रेखाकंनामधील नमूद भूखंडासाठी ६.०० मीटर रूंदीचा ना-विकास योजना रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार तयार करण्याचा मंजूर करण्यांत आलेला प्रस्ताव रद्द करणे व म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार ७.५० मीटर रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करणे.

**विषय क्र.७१ :**

शहरात प्रादेशिक विज्ञान केंद्राची निर्मिती करणे व या केंद्राकरीता लागणारी अंदाजे १० एकर जमीन ग्रहीत करणेकरीता आवश्यक बाबी आयुक्त, मनपा औरंगाबाद यांनी त्यांचे स्तरावर करणेस मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.७२ :**

जाधववाडी येथे वाहतुक नगर तयार करणेसाठी मनपाच्या ताब्यात उपलब्ध असलेल्या १० एकर जमीनीमधून उर्वरीत ४ एकर वाहतुक नगरशी संबंधीत कार्यासाठी जागा उपलब्ध असून सदर ठिकाणी वाहतूक दारांना राहणेसाठी सोय उपलब्ध करून देणे (लॉजींग) रेस्टॉरंट,बँक,ट्रान्सपोर्ट प्लाझा,वाहन दुरूस्ती, ॲटोपार्टस, गॅरेज,पेट्रोलपंप व वाहने उभी करण्यासाठी सोय उपलब्ध करणे, इत्यादीसाठी जागेचा विकास करणेचा मनपाचा मानस आहे. यासाठी सदर ४ एकर जागा ९९ वर्षाच्या भाडे तत्वावर खाजगी वाहतूक नगर देणे संबंधी.

**विषय क्र.७३ :**

मनपाच्या कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी वैद्यकीय परतावा (मेडीकल रीइमबर्समेन्ट) संबंधी हेल्थ कार्ड देणे व इन्शुरन्स कंपनीकडून अदा करणे इ.बाबत.

**विषय क्र. ७४ :**

औरंगाबाद मनपा कार्यकारी अभियंता संवर्गातील कार्यरत अति.शहर अभियंता,श्री.एम.डी.सोनवणे यांना शहर अभियंता हे पदनाम देणे.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७५ :**

वार्ड क्र.९७ करीता मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पान २२८ वर असलेल्या २० लाखाच्या तरतुदीत उर्वरीत र.रू.२ लाख विद्युत संदर्भात आवश्यकतेनुसार विविध किरकोळ कामे करण्यासाठी वळती करणे.

सुचक : श्री.अ.साजेद अ.सत्तार अनुमोदक : श्रीमती मोमीन सफिया फिरदौस अय्युब खान

**विषय क्र. ७६ :**

प्रभाग क्र.३० हर्षनगर येथील विविध कामासाठी अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : सौ.शोभा हरीश्चंद्र मिटकर अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**विषय क्र. ७७ :**

गट नं.१०३,११४,११५ नक्षत्रवाडी मधून जाणाऱ्या ४२ मिटर रूंद विकास रस्त्याचे भूसंपादन करणे संबंधी.

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.गजानन रामकिसन बारवाल

**विषय क्र. ७८ :**

वार्ड क्र.४१ येथील विविध कामासाठी अर्थसंकल्पात असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक :श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस अनुमोदक : श्री.नासेर नाहदी

**विषय क्र. ७९ :**

या वर्षी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय क्रॉस कंट्री महापौर चषक या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी होणारा खर्च महापौर निधीतून करणे.

सुचक:श्री.संजय जगताप अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.सलीम मौलाना,श्री.नासेर नाहदी

**विषय क्र. ८० :**

वार्ड क्र.५९ मधील विविध कामासाठी अर्थसंकल्पात असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : श्री.सतिष कटकटे अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील

**विषय क्र. ८१ :**

वार्ड क्र.७१ मधील विविध कामासाठी अर्थसंकल्पात असलेल्या कामाचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**विषय क्र. ८२ :**

अर्थसंकल्प २००७-०८ मधील पान क्र.W-१८५ शहरी भागात नविन कॉंक्रिट रस्ते या लेखाशिर्ष मधील अ.क्र.०४ साठी वर असलेल्या तरतूदीचे वार्ड क्र.१० मध्ये दैनंदिन देखभाल दुरूस्ती किरकोळ व फुटकळ कामे करणेकरीता लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : श्री.सलीम खॉन यासीन खॉन अनुमोदक : श्री.मिलींद दाभाडे,श्री.संजय जगताप

**पुरवणी विषय**

**विषय क्र. ८३ :**

ए.एम.टी.शहर बस वाहतुक सेवेस अत्यावश्यक ट्रान्सपोर्ट सर्व्हीस घोषित करणे.

सुचक : श्री.संजय जोशी अनुमोदक : श्री.सिताराम सुरे

**विषय क्र. ८४ :**

वार्डक्र.७४ मधील विविध कामासाठी अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : श्री.बन्सीलाल तुळशीराम गांगवे (मामा) अनुमोदक : श्री.दामोधर शिंदे

**विषय क्र. ८५ :**

सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.२६ अ.क्र.३४ वर नवीन पथदिवे व्यवस्था या लेखाशिर्षाखाली असलेल्या तरतुदीमधून र.रू.२.०० लक्ष मकसुद कॉलनी रोषनगेट भागातील विविध गल्ल्यांमध्ये पथदिवे लावणे व विद्युतीकरणाचे फुटकळ कामे करणेकरीता वळती करणे.

सुचक : श्री.मुजीब आलम शाह खान अनुमोदक : श्री.मो.जावेद मो.इसाक

**विषय क्र. ८६ :**

अर्थसंकल्प पृ.क्र.W-२५ वर अ.क्र.३ नुसार नवीन जि.आय.पोललावणे यालेखाशिर्ष असलेल्या तरतूदीमधून र.रू.१ लक्ष मकसुदकॉलनी-रोषनगेट प्रभागातील विद्युतीकरणाची फुटकळ कामे करणे या कामासाठी वळती करणे.

सुचक : श्री.मुजीब आलम शाह खान अनुमोदक : श्री.मो.जावेद मो.इसाक

**विषय क्र. ८७ :**

वार्ड क्र.६४ क्रांतीचौक मधील कामासाठी अर्थसंकल्पात पा.क्र.२०७/३० वर असलेल्या तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे.

सुचक : श्री.रेणुकादास (राजु) वैद्य अनुमोदक : श्री.खुडे विजय किसन

**विषय क्र. ८८ :**

वार्ड क्र.०१ हर्सुल येथे भिल्ल समाज स्मशानभुमी विकसित करणे ऐवजी हिंदु समाज स्मशानभुमी विकसित करणे संबंधी.

सुचक : श्री.पुनमचंद बमणे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे

**विषय क्र. ८९ :**

वार्ड क्र.८२ भारतनगर,मातोश्रीनगर अंतर्गत येणाऱ्या आनंदनगर विश्रांतीनगर, या दलीत वस्तीमध्ये शासनातर्फे येणाऱ्या दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत रस्ते, पाण्याची पाईप लाईन,ड्रेनेज लाईन इत्यादी कामासाठी तरतूद उपलब्ध करून देणे.

सुचक : सौ.पार्वतीबाई विजय वाघमारे

अनुमोदक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे, श्री.सतिष कटकटे

**विषय क्र. ९० :**

प्रभाग क्र.५४ व प्रभाग क्र.५६ मधील विविध भागात पाणीपुरवठा उच्च दाबाने व मुबलक होण्यासाठी मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकणे.

सुचक :श्री.संतोष सुधाकर जेजुरकर अनुमोदक:श्री.अशरफ मोतीवाला,श्री.त्र्यबंक तुपे,श्री.सतिष कटकटे

**विषय क्र. ९१ :**

वार्ड क्र.६८ विष्णुनगर येथे मनपातर्फे नाल्यास बांधण्यात आलेल्या संरक्षित भिंती दरम्यान बाधीत झालेल्या एकूण १४ नागरीकांना नारेगांव येथील विस्थापितांसाठी नियोजीत रेखाकंनात, विना मोबदला (मोफत) प्रत्येकी ६०० चौ.फुटाचे प्लॉट देणे.

सुचक : सौ.हर्षमाला पाटणी,श्री.सुरजितसिंग सबरवाल अनुमोदक : श्री.रविंद्र लक्ष्मणराव गांगे

**विषय क्र. ९२ :**

औरंगाबाद मनपाच्या शहर अभियंता पदाची वेतनश्रेणी १२००० ते १६५०० करणे आणि हे पद अधिक्षक अभियंता या संवर्गात आणणे,महाराष्ट्र शासनाने नुकत्याच प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र मनपा सेवा (नेमणूकीसाठी अर्हता व सेवा भरती) नियम २००७ (प्रारूप) नुसार शहर अभियंता पदाची नेमणूक करणे.

सुचक : श्री.संतोष जेजुरकर,श्री.त्र्यंबक तुपे,डॉ.भागवत कराड,सौ.लता दलाल, श्री.संजय जगताप,
श्री.कचरू श्रीपतराव सोनवणे,श्री.संजय केनेकर,श्री.हिम्मतराव दाभाडे,श्री.सय्यद खुसरो,
श्री.वसंत नरवडे पाटील, श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,श्री.खान मुजीब मीर आलम खान,
श्रीमती शकुंतला सांडूजी इंगळे,श्री.दिलीप गायकवाड, श्रीमती सुशिला भगवान रगडे,
श्री.कचरूजी मोरे,श्री.प्रशांत देसरडा,श्री.सुरजितसिंग सबरवाल,श्री.भगवान घडमोडे

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ,श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.सतिष कटकटे, श्री.प्रशांत देसरडा,श्री.जावेद कुरैशी,
श्री.अ.रशीद खान(मामू),श्री.सिताराम सुरे,श्रीमती खान मेहरून्निसा खान,सौ.मंगला प्रकाश गायकवाड,
श्री.रविकांत गवळी,श्री.सलीमपटेल,श्री.कैसरखान,श्री.सलीमखान,श्री.संजयजोशी श्री.काशिनाथ कोकाटे

**विषय क्र. ९३ :**

श्री.एस.डी.पानझडे कार्यकारी अभियंता यांची औरंगाबाद मनपाचे शहर अभियंता म्हणून नेमणूक करणे.

सुचक : श्री.संतोष जेजुरकर,श्री.जावेद कुरैशी,श्री.त्र्यंबक तुपे,डॉ.भागवत कराड,सौ.लता दलाल,
श्री.संजय जगताप,श्री.कचरू श्रीपतराव सोनवणे,श्री.संजय केनेकर,श्री.हिम्मतराव दाभाडे,
सौ.मंगला प्रकाश गायकवाड,श्री.वसंत नरवडे पाटील,श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,श्री.कैसर खान,
श्रीमती शकुंतला सांडूजी इंगळे,श्री.भगवान घडमोडे,श्री.कचरूजी मोरे,श्री.सुरजितसिंग सबरवाल

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ,श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.सतिष कटकटे, श्री.प्रशांत देसरडा,
श्री.अ.रशीद खान (मामू),श्री.मिलींद दाभाडे,श्री.सिताराम सुरे,श्रीमती खान मेहरून्निसा खान,
श्री.सय्यदखुसरो,श्री.रविकांतगवळी,श्री.सलीमपटेल,श्री.खान मुजीब आलम खान,श्री.दिलीप गायकवाड,

**04**

श्रीमती सुशिला भगवान रगडे,श्री.सलीम खान,श्री.संजय जोशी,श्री.काशिनाथ कोकाटे

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सर्वसाधारण सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०४)**

<u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ चे नियम क्र.१(ह),१(आय) आणि १ (म) अन्वये.</u>

## सूचना

**दिनांक :- २४.०१.२००८**

शुक्रवार दिनांक १८.०१.२००८ रोजी तहकूब करण्यांत आलेली औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **आता गुरूवार दिनांक ३१.०१.२००८ रोजी सकाळी ११.३० वाजता** महानगरपालिका प्रशासकीय इमारतीतील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे आयोजीत केली आहे.

प्रायोजित सभेची विषय पत्रिका यापूर्वीच सर्व स.पालिका सदस्यांना व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेली आहे.

करिता विनंती की, प्रायोजित सभेस निर्धारीत वेळी उपनिर्दीष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सर्वसाधारण सभा**
**कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (०४)**

## दुरूस्ती सूचना

**दिनांक :- २९.०१.२००८**

दिनांक ३१.०१.२००८ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेकरीता (दिनांक १८.०१.२००८ रोजीची तहकूब सभा) विचाराधीन असलेली पुरवणी विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ९२ साठी इतर सूचकांच्या नांवासह स.पालिका सदस्य श्री.प्रशांत देसरडा यांचे नांव अनावधानाने टंकलिखित झालेले आहे. ते या प्रस्तावाला सुचक नाहीत. याची सर्व स.पालिका सदस्यांनी व संबंधीतांनी कृपया नोंद घ्यावी,ही विनंती.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद